बुधवार, दि ३१ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १७ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### राष्ट्रवादी - मनसेची युती; राष्ट्रवादी ५० तर मनसे ६ जागा लढविणार

# महापौरपदाच्या शर्यतीत राष्ट्रवादी

### जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांचा दावा

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि महाराष्ट्र नवनिम र्ण सेनेचे जालना महानगर पालिका निवडणुकीत युती झाल्याची घोषणा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष तथा मनसेचे जिल्हाध्यक्ष रवी राऊत यांनी संयुक्त पत्रकार परिषदेतून केली आहे. यावेळी मधुकर आर्दड, अर्जुन कणिसे यांच्यासह राष्ट्रवादी व मनसेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या निवडणुकीत ३० जागांवर विजय मिळणार असल्याचा दावा जिल्हाध्यक्ष श्री चव्हाण यांनी केला असून आम्ही ५६ शिलेदार म्हणजेच ५६ इंची सिना घेऊन मैदानात उतरलेलो असल्याचे असे सूचक विधान करत त्यांनी युतीच्या ताकदीवर विश्वास व्यक्त केला.

पुढे बोलतांना श्री चव्हाण म्हणाले की, महायुतीतील दोन्ही पक्षांनी आम्हाला कमी लेखले. त्यांच्या बैठकांवर बैठका व्हायचा मात्र, त्यांच्यात काय सुरु आहे हे कळू देखील दिले नाही. त्यामुळे राष्ट्रवादीने स्वतंत्र्य लढण्याचा निर्णय घेतला. निर्णय घ्यायला थोडा उशिर झाला मात्र, तरी देखील राष्ट्रवादीच्या कार्यालयावर उमेवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मोठी गर्दी झाल्याचेही त्यांनी सांगितले. त्यातच महाराष्ट्र नवनिर्माण सेने सोबत युती केली असून राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागांवर तर म नसे ५ जागांवर युतीत निवडणुक लढविणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगर परिषद निवडणुकीत दोन नंबरला राहिला आहे. त्यामुळे मराठवाड्यात राष्ट्रवादीची हवा आहे. आणि आजचा राष्ट्रवादीला मिळालेला प्रतिसाद पाहता जालना महानगर पालिकेत किमान ३० जागा निवडून येण्यार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याच बरोबर महापौर अथवा उपमहापौर हा राष्ट्रवादीचा होणार असल्याचा दावा करतांनाच आता महापौर पदाच्या शर्यतीत राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचे त्यांनी सांगितले.

एका जागेवर मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचेही यावेळी धैर्यशिल चव्हाण यांनी सांगितले.

**राष्ट्रवादीने सन्मान दिला -राऊत**

विधानसभेत शिवसेना (शिंदे गट) ला मनसेने पाठींबा दिला होता. त्यावेळी शिवसेनेने महानगर पालिकेत काही जागा देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र, त्यांनी साधी बोलणी करण्याची तसदी न घेतल्याने राष्ट्रवादीकडून आलेला प्रस्ताव स्विकारला असून राष्ट्रवादीने आम्हाला सन्मान दिला असल्याचे मनसेचे जिल्हाध्यक्ष रवी राऊत यांनी म्हटले आहे. कायम राष्ट्रवादीबरोबर राहू असा शब्द यावेळी राऊत यांनी दिला असून अधिकाधिक जागा जिंकून आणण्यासाठी राष्ट्रवादीच्या खांद्याला खांदा लावून मनसेचे सैनिक या निवडणुकीत प्रयत्नशिल राहणार असल्याचेही श्री राऊत शेवटी म्हणाले.

मनसेकडून प्रभाग एक अ मधून राहुल बबन रत्नपारखे, प्रभाग २ क म्हणून विलास तिकांडे, तीन दिनेश कणसे, चारमधून अर्जुन कणसे, सहा मधून विवेश शाईवाले, तेरा मधून महेश नागवे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रभाग क्र. १ मधून शिंदे भाग्यश्री प्रविण (ब), कोल्हे अनिता संजय (ड), शिंदे प्रविण बबनराव (इ), प्रभाग क्र.२ १) करण गणेश नवले (क), प्रभाग क्र.३ ललित सुभाष कुचेकर (अ), वैष्णवी विजय जाधव (क), जम ीलाबी महम्मद खैराती (ड), प्रभाग क्र.४ रायपेल्ली लता नरेश (क), शेख फारूख शेख इब्राहीम (ड), प्रभाग क्र.५ चंद्रसेन प्रेमानंद निर्मल (अ), क्र.६ शैला फ्रान्सीस निकाळजे (ब), निर्मलाबाई हेमचंद सले (अ), करिष्मा मयुर भुरेवाल (ब), राहुल अर्जुन भगत (क), भगत राजू छोटेलाल (ड), क्र. ७ ज्ञानेश्वर सुधाकर क्षीरसागर (अ), श्रीरामवार राजेश्री दिलीप (ब), शाकेरखॉन जहीरखॉन (ड), क्र.८ तस्लीम एजाज बेग (अ), वैष्णव उर्मिला राजेंद्र (ब), अर्जुन नामदेव वानखेडे (क), म ोहंमद इम्रान मो. बागवान (ड), प्रभाग ९ मधून मिनाबाई सुनिल सुपेकर (ब), बेग मिर्झा अथर (ड), तरन्नुम अब्दुल रशिद शेख (ब), प्रभाग दहा मधून खॉन शहा आलमखॉन मियाखॉन (अ), वंदना सतिष खांडेभराड (ब), रिजवाना परविन अख्तर शेख (क), प्रभाग ११ मोहम्मद इम्रान मो. युनूस (अ), शहाजहाँ छोटेमियॉ सय्यद (ब), अफरीन नूरी शेख यूनाफ (क), शेख सलिम मोहंम्मद (ड), क्र. १२ इंचे गणेश अशोक (अ, शिरीन फातेमा सोहेलखॉन (ब), चव्हाण कविता गणेश (क), अन्वर मोहम्मद तांबोळी (ड), क्र. १३ आरती अभिषेक जाधव (ब), शेख मोहसीन अलीमोद्दीन (ड), संध्या प्रमोद ठाकुर (), प्रभाग १४ सुनिता भगवान तायड (अ), सौरभ भगवान भिसे (ब), शोभा शांतीलाल लोंढे (क), आनंद प्रदिप लोखंडे (ड), क्र. १५ कल्पना प्रभाकर घेवंदे (अ), सोनवणे विजय बाबूराव (ब), राणा यास्म ीन अमजदखॉ पठाण (क), सुतार सीमोन बन्सी (ड), प्रभाग क्र. १६ अर्जुन किशोर धाकतोंडे (अ), बारोटे शितल कैलास (क), सुनिल सुधाकर रत्नपारखे (ड) हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### विकासाच्या मुद्द्यावर जनतेत- आर्दड

जालन्यातील जनता सहानुभूती दाखवेल, आम्ही विकासाच्या मुद्द्यावर जनतेत जाणार असल्याचे मधुकरराव आर्दड यांनी यावेळी सांगितले. शहराचे प्रश्न आहेत. विद्युत, कचरा, अस्वच्छता, रस्ते, नागरिकांना महानगर पलिकेकडून मिळणाऱ्या सेवांचा प्रश्न आहे. त्यासाठी स्मार्ट वर्कींग मनपात आणण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. त्याच बरोबर मनपा निवडणुकीत जनतेत जाण्यापुर्वी उमेदवारांची शेवटी यादी फायनल झाल्यानंतर एक कार्यशाळा घेणार असल्याचेही श्री आर्दड म्हणाले.



## ग्रामपंचायतींत स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीचा प्रस्ताव शासनाकडे - जिल्हाधिकारी



**जालना । प्रतिनिधी -** केंद्र सरकारच्या WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाअंतर्गत जालना जिल्ह्यातील ६९३ ग्राम पंचायतींमध्ये स्वयंचलित हवामान केंद्र (थड - Automatic Weather Station) बसविण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

जिल्ह्यात दरवर्षी पावसाळ्यात प्रत्येक गावात झालेल्या पर्जन्यमानाची अचूक व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध होत नसल्याने, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याचा निर्णय सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आला होता. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीकडून आवश्यक प्रस्ताव मागविण्यात आले होते. जालना जिल्ह्यात एकूण ७९१ ग्रामपंचायती असून, त्यापैकी ४९ ग्रामपंचायतींमध्ये यापूर्वीच स्वयंचलित हवामान केंद्र कार्यान्वित आहेत. उर्वरित ग्रामपंचायतींपैकी ६७१ ग्रामपंचायतींमध्ये शासकीय जागेत, तर २२ ग्रामपंचायतींमध्ये भाडेतत्त्वावर जागा घेऊन स्वयंचलित हवामान केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

यासंदर्भातील सर्व प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले असून, ते शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार पान २ वर

### जालना महानगरपालिका निवडणूक; राष्ट्रवादी-मनसे, एमआयएम स्वबळावर

# महायुतीत फुट, आघाडीत एकजूट

**दीपक शेळके**

**जालना -** जालना महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत राजकीय चित्र पूर्णपणे बदलले असून, महायुतीत स्पष्टपणे फुट तर विरोधी आघाडीत मात्र एकजूट दिसून येत आहे. एकीकडे महायुतीतील पक्ष स्वतंत्रपणे अथवा वेगवेगळ्या युतीत निवडणूक लढवत असताना, दुसरीकडे काँग्रेस, शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना एकत्र येत आघाडीच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. तसेच एमआयएमनेही जवळपास पंधरा शिलेदार मैदानात उतरविले आहेत. त्यामुळे जालना महानगरपालिकेची निवडणूक अधिकच चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपने या निवडणुकीत स्वतंत्रपणे लढण्याची भूमिका घेतली आहे. तर शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह युती करून निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्य पातळीवर एकत्र असलेली महायुती जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत मात्र विभागलेली दिसून येत आहे. या फुटीचा थेट परिणाम मतांच्या विभाजनावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, भाजपकडून उमेदवारांची घोषणा होताच स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. माजी आमदार आणि नुकतेच काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेले कैलास गोरंट्याल यांच्या पत्नी संगीता गोरंट्याल आणि मुलगा अक्षय गोरंट्याल यांना भाजपकडून तिकीट देण्यात आले आहे. त्यामुळे गोरंट्याल कुटुंबीयांची राजकीय ताकद महानगरपालिका निवडणुकीत पणाला लागली असून, हा निर्णय चर्चेचा विषय ठरला आहे.

याशिवाय भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे बंधू भास्कर दानवे आणि त्यांच्या पत्नी सुशीला भास्कर दानवे हेही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे भाजपकडून घराणेशाही आणि प्रभावी राजकीय कुटुंबांवर भर दिल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे भाजपची लढत अधिक ताकदीची असली, तरी म हायुतीतील इतर घटक पक्ष वेगळ्या आघाड्यांमधून लढत असल्याने मतांचे ध्रुवीकरण होण्याची शक्यता आहे. याचा थेट फायदा हा एम आयएमला होण्याची शक्यता राजकीय विश्लेषंकाकडून वर्तविली जात आहे. दुसरीकडे, विरोधी आघाडीमध्ये मात्र चित्र वेगळे आहे. काँग्रेस, शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांनी एकत्र येत महापालिका निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. वंचित बहुजन आघाडी वगळता जवळपास सर्व विरोधी पक्ष एकाच व्यासपीठावर आल्याने आघाडी अधिक मजबूत झाल्याचे मानले जात आहे. महायुतीतील फुटीचा फायदा घेत आघाडी सत्तेवर दावा ठोकण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत.

एकूणच, जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीत फुट आणि आघाडीत एकजूट हेच प्रमुख वैशिष्ट्य ठरणार आहे. छाननी त्यानंतर येत्या दोन तारखेला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख यानंतर नेमके मैदानात किती उमेदवार शिल्लक राहतात यावर सर्व काही अवलंबून आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमधील ही गुंतागुंतीची राजकीय गणिते मतदारांच्या निकालातून कशी स्पष्ट होतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आत्मचिंतन आणि विचार मंथन करणारा

२०२५ साल संपायला आति काही दिवसच बाकी आहे. मागे वळून बघितले असता अनेक गोष्टी घडून गेलेल्या आहेत, त्याचा मागोवा घेणे आणि येणाऱ्या नवीन २०२६ या वर्षात त्यात काही चांगले करता येईल का किंवा करायला पाहिजे असा विचार सर्व पातळीवर होणे तेवढेच आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्र, महिलांवरील अत्याचार, सोशल मीडियाचा अतिरेक, शेतकरी वर्गातील अस्वस्थता, बेरोजगार युवकांचा प्रश्न,महागाई, राजकारणातील हेवेदावे, तत्वहीन राजकारण, वाढती गुंडगिरी. राजकारणाची घसरलेली पातळी, मराठी भाषा संवर्धन आणि मराठी शाळेचे प्रश्न,पर्यावरण, प्रदूषण, अशा अनेक गोष्टीवर विचार मंथन होणे आवश्यक आहे.

तरुण पिढी बेरोजगारीच्या विळख्यात सापडली आहे. या बेरोजगारीच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी तरुणांनी व्यवसायाकडे वळायला पाहिजे, तर ती व्यसना कडे वळत आहे.

जालना जिल्ह्यात शाळेत मुलांचे शिक्षकांचे त्रासाला कटाळून मुलीने केलेली आत्महत्या.

प्रॅक्टिकलचे गुण वाढवून देण्याच्या बहाण्याने १६ वर्षीय विद्यार्थिनीस घरी बोलावून शिक्षकाने तिच्यावर केलेला बलात्कार . पीडितेच्या मैत्रिणीला व्हिडीओ कॉल करून स्क्रीन रेकॉर्डींग करायला लावणे,धमकावून लैंगिक अत्याचार करणे,

जुन्नर तालुक्यातील ओतारी येथील सात वर्षाच्या मुलीवर शेजाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याची घटना, पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेलेल्या महिलेवर पोलीस स्टेशनमध्ये केलेले लैंगिक अत्याचार,

लॉज मध्ये रूम चुकून दुसऱ्या रूम मध्ये गेलेल्या महिलेवर मद्यधूंद अवस्थेत तिघांनी केलेला बलात्कार, सांगलीच्या ईश्वरपूर परिसरात इयत्ता आठवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर दोन जणांनी केलेला बलात्कार अमरावतीत एक धक्कादायक घटना घडली. दिव्यांग अल्पवयीन मुलीवर घरात शिरून दोन तरुणांनी लैंगिक अत्याचार केला. ही गंभीर घटना उघडकीस आली. हे अमानुष प्रकार काय दर्शवितात ? वैचारीक पातळी किती खालावलेली आहे.

महिलांवरचे अत्याचार हा एक मोठा विचार करायला लावणारा प्रश्न आज समाजात आ वासून उभा आहे. दोन वर्षाच्या मुलीपासून तर ६०/६५ वर्षाच्या महिलांवर काही नराधमाने बलात्कार केल्याचे आपल्या वाचनात येते, समाजातील अशा घातक मनोविकृत व्यक्ती आहेत ज्यांच्यामुळे परिवारातील आणि समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना एकटीला घराबाहेर जाणे कधी कधी त्रासदायक होते. हे नराधम केवळ बलात्कारावर थांबत नाहीत तर पुरावा नष्ट करण्यासाठी त्या मुलीचा अथवा महिलेचा खून देखील करतात इतकी क्रूरता या समाजातील काही मनोविकृत लोकांमध्ये भरलेली दिसून येते.

शाळेत विद्यार्थ्या समोर शिक्षक दारु पिउन धिंगाणा घालतात. जिथे संस्कार होणे अपेक्षित असते त्या ठिकाणी अशाप्रकारे कृती घडत असेल तर शिक्षण विभाग काय करत आहे ? हा एक प्रश्न उपस्थित केला जातो. शाळेमध्ये दारू पिणे मुलीशी लैंगिक चाळे करणे अशा प्रकारांना ताबडतोब आळा बसायला हवा.अशा शिक्षकांना नोकरीतून बडतर्फ करायला हवे.कडक कारवाई करावी.

अशा हजारो घटना आपल्या आजूबाजूला घडत आहेत अशाप्रकारे होणारे स्त्रियांवरील अत्याचार, हिंसाचार कमी करायचा असेल तर कायदे आणि त्यांची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहेच, पण त्या बरोबरच स्त्री-पुरुषांची मानसिकता बदलण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी कराव्याच लागतील. आपल्या समाजासमोरचे हे फार मोठे आव्हान आहे.लाडक्या बहिणीच्या सुरक्षिततेची हमी घ्यायला हवी.

भ्रष्टाचाराने तर परिसीमा गाठली आहे. एका जिल्ह्याततर तलाठ्यांनी पूरग्रस्त मदतीत तब्बल १०० कोटींचा भ्रष्टाचार केला. स्वतःच्या सग्यासोयऱ्यांकडे शेतकऱ्यांचे पैसे वळवले.ही बातमी आपण वाचली असेलच. भ्रष्टाचाराच्या केस मध्ये अनेक सरकारी अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पोलीस अधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी,राजकीय क्षेत्रातील नेते, अभियंते, आदी निरनिराळ्या खात्यात असंख्य कर्मचाऱ्यांना, अधिकार्यांना पकडल्याचे आपण नेहमी वाचतो. अद्यापही ना खाऊंगा ना खाने दूंगा याची पूर्तता झालेली नाही.हे राज्य बेवारस झालेलं आहे का ?. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. कोणाचं कोणावर नियंत्रण नाही. कोणाचा कोणाला धाक नाही. असे का व्हावे.? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सबका साथ सबका विकास नावाखाली अनेक पक्षातील मंडळी सत्ताधारी पक्षात सामील होत आहेत. विकासासाठी आम्ही सत्तेत सामील होत आहे हेच पालूपद आहे. त्यांची तत्त्व जुळत नसली तरी सत्तेसाठी ते सामील होत आहे हे सांगायला नको. आत्ताच नुकत्याच नगर पंचायत, नगरपरिषद निवडणुकांमध्ये युतीमधीलच पक्ष एकमेका समोर उभे राहिले म्हणजे सत्तेसाठी काहीही.....

सोशल मीडियाचा आता अतिरेक झालेला आहे. ज्याचा उपयोग विकासासाठी व्हायला हवा ते चित्र काही वेगळेच दिसते आहे. त्यामुळे समाज अधोगतीकडे चालला आहे हे स्पष्ट दिसते. राजकीय क्षेत्रातील महिलांच्या वक्तव्यावर अतिशय खालच्या पातळीवर प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. टिप्पणी केली जाते. तसेच वारंवार काही महिलांचे फोटो टाकून त्याच्यावरही अश्लील ती टिप्पण्या केलेल्या असतात. एकीकडे महिला सन्मानाच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे अशाप्रकारे त्यांची विटंबना केली जावी आणि त्यावरही काही बंधन नसावे याचे आश्चर्य वाटते.अगदी पंतप्रधान, गृहमंत्री मुख्यमंत्री राजकीय क्षेत्रातील महिला यांचे विकृत चित्र ही पोस्ट केले असतात.

फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप,
यु ट्युब, आदी गोष्टीमुळे विद्यार्थी तसेच तरुण पिढीचे लक्ष केंद्रित झाले असल्यामुळे सहाजिकच त्यांची वाचनाची आवड कमी झाली आहे.शहरी भागात जरी पुस्तक महोत्सव वगैरे होत असले तरी सर्वच भागामध्ये त्याचा परिणाम नसतो.साठ टक्के जनता ग्रामीण भागात विखूरली आहे.

अशावेळी ज्या ठिकाणी वाचकांपर्यंत पुस्तक जाणे आवश्यक आहे तिथे असे कार्यक्रम व्हायला हवे. जेणेकरून विद्यार्थी वर्गावरील फेसबुक इंस्टाग्राम युट्युब याचे वेड कमी होईल. तसेच सध्या युट्युब वर फार मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे विषयावरील व्हिडिओ शॉट्स येत असतात बऱ्याच वेळा अशा व्हिडिओमधील सत्यता काय आहे हे समजत नाही आणि त्यामुळे वैचारिक गोंधळ निर्माण होतो आणि त्याचे परिणाम समाजात होताना दिसतात.



अश्लील आणि अचकटविचकट रील्स बनवण्याचे आणि पाहण्याचे प्रमाण इतके वाढले आहे की त्यामुळे लहान मुलांच्या मानसिकतेवर गंभीर परिणाम होत आहेत. मोबाईलच्या अतिप्रमाणात होणाऱ्या वापरावर समाजमाध्यमातून अथवा मोठमोठ्या शाळा महाविद्यालयातून जनजागृती करून याला प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेच आहे. यासाठी प्रत्येकाने स्वतः पुढे येवून स्वतः पासून सुरुवात करून समाजाला हा संकल्प करून दाखवला पाहिजे तरच येणारी उद्याची नवीन पिढी जागृत होईल अन्यथा याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागणार आहे.

वर्षभरात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याची अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतित झालेला आहे वेळोवेळी त्याला सरकारी मदत नुकसान भरपाई देण्याची आश्वासन दिले गेले त्यातील काही प्रमाणात पूर्तता झाली.पिक विमा रक्कम मिळाली नाही. कर्जमाफीचे प्रकरण मात्र ३० जून पर्यंत पुढे ढकलले गेले आहे. त्यातही ३१ मार्च २०२६ ला जे शेतकरी थकबाकीदार होतील त्यांना कर्जमाफी मिळणार का ? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातही मोठ्या प्रमाणात गोंधळ आहे.त्यात स्पष्टता नाही. सत्तेच्या राजकारणात शेतकऱ्याचे प्रश्न बेरोजगारीचा प्रश्न, महागाई स्त्रीअत्याचार ,भ्रष्टाचार, मराठी भाषा संवर्धन,मराठी माध्यमाच्या शाळाचा प्रश्न, या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते आहे. सततच्या निवडणुकांमुळे राजकीय नेते सरकारी अधिकारी त्यातच गुंतलेले असतात.आता महानगरपालीका,पंचायत समितीच्या, जिल्हा परिषदेच्या निवडणूका सततच्या निवडणुकांमुळे राजकीय नेते सरकारी अधिकारी त्यातच गुंतलेले असतात.

राजकीय क्षेत्रात, समाजात एकूणच दुर्जन शक्तीचा प्रभाव वाढलेला आहे . वाढत चालला आहे .सज्जनशक्ती अपुरी पडत आहे अशावेळी या सगळ्या घटनांचा विचार करता कुठेतरी या बाबतीत विचार मंथन होणे आवश्यक आहे. तोच ह्या नववर्षाचा म्हणजे २०२६ चा संकल्प ठरावा.

नववर्षात केवळ कॅलेंडर बदलत नाही, तर आत्मपरीक्षण, आत्मविश्वास वाढवणे आणि स्वतः ला सुधारण्यासाठीची संधी आहे. नवीन संकल्प, नवीन अपेक्षा आणि सकारात्मक विचारांची बीजे इथे रोवली जातात.

निरोप आणि नववर्षाचे स्वागत सर्वत्र पाहायला मिळेल. आशा करूया की, या जल्लोषाबरोबरचा उत्साह प्रत्येक क्षेत्रात ऊर्जा देणारा ठरो. मंगलदायी ठरो.

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव. ८९९९५६६९१७**

## मधुनगर जिप प्राशा शाळेत व्यवस्थापन समिती गठीत

**हसनाबाद । प्रतिनिधी** - भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मधुनगर येथे शाळेत नवीन शाळा व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली.यासाठी गावचे सरपंच सुरेश काकाजी व जवखेडा बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख यशवंत जोशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली व शालेय समिती व्यवस्थापन समिती गठीत करण्याच्या शासनाच्या परिपत्रकीय नियमानुसार शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली.यात अध्यक्ष म्हणून सौ स्वाती दत्ता खरात,उपाध्यक्ष पदी सौ रेखा सचिन मेहरा यांची बिनविरोध चिठ्ठी काढून निवड करण्यात आली. सदस्य पदी दादाराव सखाराम वाल्डे, आस्मां आसीफ बागवान,अनिल रमेश ऊमरे, आरेफ भिक्कन आतार, शिरीन वसीम शेख,मनिषा शिवाजी रामफळे, धनराज अफसर चव्हाण यांची वर्ग वाईज आरक्षण काढून बिन विरोध निवड अरण्यात आली.या समितीत शिक्षण प्रेमी देवलाल आकोदे,शिक्षक प्रतिनिधी सुनील सरकटे,विद्यार्थी प्रतिनिधी हुमेरा अमजत आतार,सदफ रईस बागवान यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.नवीन शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यासाठी सर्व पालक, शिक्षण प्रेमी देवाभाऊ आकोदे यांची उपस्थिती होती.

पान १ वरुन

### ग्रामपंचायतीत स्वयंचलित ...

आहेत. या प्रकल्पामुळे पर्जन्यमान, तापमान, आर्द्रता यासह हवामानविषयक अचूक माहिती उपलब्ध होणार असून, शेती नियोजन, पीक विमा, आपत्ती व्यवस्थापन व शेतकऱ्यांच्या निर्णय प्रक्रियेस मोठा लाभ होणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नमूद केले.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# सुसंवादी, निस्वार्थ सेवाभावी आणि अभ्यासू शिक्षणक्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्त्व प्रा. दत्ता देशमुख यांची सेवानिवृत्ती

हे एक सुसंवादी, निस्वार्थ सेवाभावी, अभ्यासू व्यक्तिमत्व, भेटल्यानंतर समोरची व्यक्ती आपलंसं करून घेण्यात ज्याचा हातखंडा आहे असे हे नेतृत्व. माझे गुरुवर्य,इतिहासाचे, समाजशास्त्राचे प्राध्यापक, नुसतेच प्राध्यापक नसून ते गाढे अभ्यासक सुद्धा आहेत. इतिहासाचा सखोल चिकित्सक अभ्यास करून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात त्यांचा हतखंडा आहे. यांची नवभारत शिक्षण संस्था टेंभुर्णी, द्वारा संचलित पूर्वाश्रमीचे नवभारत हायस्कूल, आत्ताचे श्रीमती जे बी के विद्यालय टेंभुर्णी व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय टेंभुर्णी . येथे २६ जुलै १९८८ रोजी गणिताचे शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. विद्यार्थ्यांच्या गळी उतरवण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवणारे, आणि बघता बघता सर्व विद्यार्थ्यांना सर्व प्राध्यापकांना, तेथील शिक्षकांना तेथील मुख्याध्यापक,प्राचार्यांना आपलंसं करून घेण्यामध्ये त्यांना वेळ लागला नाही. त्या काळातल्या आपल्या सहकाऱ्यांसोबत विविध उपक्रमासाठी लागणार ज्ञान हस्तगत करून त्यांच्यासोबत तसेच स्वतः विद्यार्थ्यांप्रती ज्ञान देण्यासाठी सतत धडपडणारे, विद्यार्थी, त्यांचे पालक यांच्या सुसंवाद घडवून आणून, विद्यार्थी,. गावातील व्यक्तींची त्यांचा सुसंवाद, आणि सुसंवाद साधण्याची कला, सुसंवाद साधत असतानाच सर्वप्रथम ते त्याच्या अडीअडचणी विचारत असत, अडीअडचणी विचारल्या म्हणजेच तो आपलासा कसा होईल याकडे त्यांचा कल असतो. विद्यार्थी असो व्यक्ती असो नागरिक असो पालक असो भेटल्यानंतर अगदी आनंदी कसा राहील हेच त्यांनी पाहिलं. विद्यार्थ्याला सखोल ज्ञान देण्याबरोबरच, विद्यार्थी वर्गात हसत खेळत कसे राहतील हेच पाहिले. विद्यार्थ्यांना शिकवताना तो विषय कसा समजेल याकडे त्यांचा कल असायचा. विद्यार्थी अभ्यासानंतर मूल्यमापनाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये उत्तरे सोडवण्याची कला कशी आत्मसात करेल याकडेही त्यांचा कल असायचा. सुसंवादी नेतृत्वाचा आज सेवानिवृत्तीचा दिनांक आहे. ३१डिसेंबर २०२५. नवभारत हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवी ते सातवी ला शिकवताना त्यांनी आपला गणित हा आवडीचा विषय निवडला आणि ते विद्यार्थ्यांना गणित शिकू लागले. पाहता पाहता त्यांना विज्ञान इतिहास हिंदी या विषयांचे ही आवड निर्माण होऊन ते विद्यार्थ्यांना याविषयी शिकू लागले. या विभागात पाच वर्षे सेवा केल्यानंतर १९९३ मध्ये ते माध्यमिक विभागामध्ये पदोन्नतीने नियुक्त झाले. तिथेही इतिहास हिंदी या विषयाचे ते ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत असतानाच भूगोल व अर्थशास्त्र हा विषय सुद्धा अगदी सहज आणि लिलया पद्धतीने शिकू लागले. हे सर्व करत असतानाच त्यांनी, आपले शिक्षण सुद्धा चालू ठेवलेले होते या दरम्यान त्यांनी पदवी मिळवली आणि पदव्युत्तर पदवी मिळवली व, शिक्षण शास्त्रातील महत्त्वाची पदवीही सुद्धा मिळवली. या शिक्षणाच्या जोरावरच संस्थेने त्यांना १९९६ पासून संस्थेच्या नवभारत कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून पदोन्नती दिलेली आहे. तेव्हापासून ते कॉलेजला प्राध्यापक म्हणून इतिहास आणि समाजशास्त्र विषय शिकवितात. तसेच त्यांना पर्यावरणाची आवड असल्याने पर्यावरण हा विषय सुद्धा ते उत्तम पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत शिकवितात.

**समाजभान असलेला माणूस**ः शिक्षकी पेशा स्वीकारल्यानंतर शिक्षकाची समाजाची नाळ जोडलेली असते, विद्यार्थ्यांच्या पालक यांच्याशी सुसंवाद जाताना समाजातील अनेक लोकांशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झाला. समाजातील लोकांची समस्या सोडवून घेताना समाजभान कसं राहील याची नितांत भावना त्यांच्या मनामध्ये असते. आणि ती सदोदित जपण्याचं काम, त्यांच्या देशमुख परिवाराकडून वारसा मिळालेला असल्याने समाजभान जपणारा माणूस म्हणून सुद्धा त्यांचा लौकिक आहे.

शिक्षकी पेशीमध्ये त्यांनी विविध अंगाने आपलं शिक्षण देणे सुरू ठेवलेले असताना विविध उपक्रम राबविलेले होते. शालेय जीवनामध्ये स्काऊटचे शिक्षण मिळालेल्या देशमुख सरांना स्काऊट या विषयाचे आवड निर्माण झालेली असल्यामुळे त्यांनी स्काऊट हा विषय अत्यंत सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना समजावा म्हणून व विविध उपक्रम स्काऊटच्या माध्यमातून राबवावी म्हणून उत्तम स्काऊट शिक्षक म्हणून सुद्धा त्यांचा नावलौकिक आहे, त्यांनी स्काऊट हा विषय शिकवताना विद्यार्थ्यांना राज्य पुरस्कार मिळवून दिले. विविध जिल्हा मेळाव्यामध्ये विभागीय मेळाव्यामध्ये शाळेला विविध बक्षिस सुद्धा मिळवून दिलेली आहेत. माझ्याशी बोलताना त्यांनी स्काऊट बद्दल सांगितले की माझ्या सहकाऱ्यांनी सुद्धा मला या कामी मदत केलेली आहे.

**उत्तम हलगी पटू** : शाळेमध्ये लागल्यापासूनच कवायतीची आवड असणाऱ्या देशमुख सरांना त्यांच्या शालेय जीवनात त्यांचे गुरु डिगोळे सरांकडून कवायतीचे शिक्षण घेत असताना हलगीच सुद्धा शिक्षण मिळाले आणि त्यामुळेच त्यांनी प्रयत्नाने हलगी शिकून घेतली आणि विद्यार्थ्यांना हलगीच्या तालावर लेझीम कवायत ला मदत करताना क्रीडा शिक्षकांना मदत करताना, उत्तम हलगीच्या तालावर कवायत शिकवण्यासाठी मदत केलेली आहे. लहानपणापासूनच नाटकाची आवड असल्यामुळे, व या कामासाठी आदर्श शिक्षक शेख जमीर सर यांचं नाट्य दिग्दर्शन त्यांना खूप भावले आणि त्यांनी त्यांच्या कार्यकाळात, विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात नाटकांत विद्यार्थ्यांकडून नाटके सुद्धा बसून घेतलेली आहेत. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करताना त्यांना उत्तम संचालन कसे करता येईल याकडे त्यांचे लक्ष असायचं आणि ते उत्तम संचालन करतात.



विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ते एखादी भूमिका घेऊन त्यासाठी स्वतः खर्च करून दरवर्षी एखादी वेगवेगळ्या प्रकारची भूमिका साकारण्यासाठी ते तयार असायचे म्हणजे यामध्ये श्रीकृष्ण, मल्हारी हे त्यांचे गाजलेले भूमिका विशेष होत.

प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख यांचा जन्म टेंभुर्णी गावातीलच. ५ डिसेंबर १९६७ ला ते टेंभुर्णी त्यांचा जन्म झाला. टेंभुर्णी गावातच प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर ज्या शाळेत नोकरी करायला मिळाली त्या शाळेत त्यांची पाचवी ते दहावीचे सर्व शिक्षण पूर्ण झाले. अकरावी बारावी त्यांचे देऊळगावराजा हायस्कूल येथे झाले. व पुढील शिक्षण जालना येथे त्यांनी घेतलेले आहे. हे करत असताना त्यांनी आपली जिद्द सोडलेली नव्हती गरीब परिस्थितीतून पुढे जाऊन कसे शिकावे हे त्यांनी एक आदर्श म्हणून समाजापुढे दाखवून दिलेले होते त्यांनी त्यांच्या या शिक्षकी पेशीमध्ये अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले मदत केली आणि हा त्यांचा वारसा त्यांनी पुढे नेलेला आहे. त्यांच्या या शिक्षकी पेशीमध्ये ज्युनिअर कॉलेजच्या माध्यमातून त्यांनी परीक्षक नियामक अभ्यास मंडळाचे सदस्य, वरिष्ठ निवड श्रेणी तसेच विविध प्रशिक्षकाच्या भूमिकेत तालुका जिल्हा राज्य स्तरावर आपलं व्यक्तिमत्व निर्माण केलेलं आहे. हे सर्व करत असताना उत्तम शिक्षक कसा असावा हे त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणून सर्व शिक्षकांसमोर आहे. विद्यार्थी त्यांच्यापर्यंत पोहोचला म्हणजे त्याची समस्या सुटली.

सु- स्वभाव त्यांचा आहे. त्यांच्याबद्दल बोलावे तितके थोडेच आहे त्यांच्याबद्दल लिहावे तितके थोडेच आहे. त्यांच्या संपर्कात आलेला प्रत्येक व्यक्ती काही ना काही शिकून जातोच हा त्यांचा स्वभाव अगदी सहज घेण्यासारखा आहे. शालेय जीवनात ती विद्यार्थ्यांना शिकवतात एवढ्यावरच ते थांबलेले नाही. चार चौकटीत शिकून चार चौकटीच्या आतच आपला स्वभाव ठेवावा असा स्वभाव त्यांचा नाही. चौकटी बाहेरचे शिक्षणही विद्यार्थ्यांना मिळालं पाहिजे यासाठी त्यांचा आग्रह असतो. समाजाला ही चौकटी बाहेरचे शिक्षण मिळाले पाहिजे समाज सुद्धा चौकटी बाहेर आला पाहिजे यासाठी त्यांचा नेहमी सातत्याने प्रयत्न असतो. त्यांच्यापासून धातृत्व दानशूरता संयम अशा अनेक गुणांचा संचय त्याच्या मध्ये आहे. ते शिक्षण क्षेत्रातच नाही तर सहकार क्षेत्रामध्ये सुद्धा त्यांचा दबदबा, मग गणेश नागरी च्या माध्यमातून असो, महेश पतसंस्थेच्या माध्यमातून असो. विविध शैक्षणिक संस्था निर्माण करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तेजा शिक्षण संस्थेमध्ये आहे तिथे सुद्धा ते स्वतः संचालक आहेत, महेश शिक्षण संस्थेत सुद्धा स्वतः संचालक आहे, ते महेश चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक सचिव आहेत. ते दत्त संस्थानचे विश्वस्त आहेत. ते गणपती संस्थानचे विश्वस्त आहे. ते रेणुका माता संस्थानचे सचिव आहेत. विविध सामाजिक धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असतो. वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष आहे. या माध्यमातून त्यांनी शिवचरित्र पुष्पांजली या आठ भागातल्या ग्रंथाच्या निर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामध्ये अभ्यासपूर्ण लेखन करण्याची त्यांची कला पुढे आलेली आहे. इतिहास प्रबोधन संस्थेचे ते यावर्षीचे अध्यक्ष सुद्धा आहेत. विविध इतिहासिक संस्थानांना भेटी देण्यात त्यांचा पुढाकार झालेला आहे. धुळ्याच्या इतिहास संशोधन संस्थेचे अजून सभासद आहे. समाज बांध राहो म्हणून सामाजिक क्षेत्रातही त्यांचा अग्रेसर आहे. एवढ्यावरच ते थांबलेले नसून पत्रकारितेची आवड असल्यामुळे ते पत्रकार क्षेत्रात सुद्धा कार्यरत आहेत आणि विविध पद्धतीने लिखाण करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

त्यांच्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं म्हणणं असं असतं की शिक्षकी पेशा हा असा आहे की विद्यार्थी पालक तसेच शिक्षण संस्थेची येणारे सर्व घटकांशी संवाद साधण्याची कलाजाच्या जवळ आहे तोच या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो म्हणून माझा नेहमी प्रयत्न असा असतो की, त्या क्षेत्राशी जेवढे घटक आहेत त्या घटकाची सुसंवाद साधणे मग प्रशासनिक बाबीचा असो सामाजिक क्षेत्राच्या बाबीचा असो तो घटक आपण समजावून घेतला पाहिजे. सरांना तालुक्यातीलच नाही, जिल्हा विभाग राज्य लेव्हलवर सुद्धा सरांची अत्यंत ओळख असून अनेक लोक त्यांच्या संपर्कामध्ये आहेत. सर्वांना मार्गदर्शन करणारी आहे. ज्यांची सेवा जवळपास ३८ वर्षे झालेली असा दांडगा अनुभव ज्याच्याजवळ आहे यांच्याकडून शिकण्यासारखे भरपूर आहे त्यांच्याबद्दल लिखाण करण्यासारखं भरपूर आहे एकदा त्यांच्याशी भेट झाली म्हणजे आपलं जीवन सार्थक होतं असा अनुभव माझा स्वतःचा आहे. मातृभाषेतील शिक्षण घेण्याचा आनंद ते नेहमी बोलून दाखवतात. मातृभाषेतील शिक्षण घेतल्यानेच आपण या स्तरापर्यंत आलेलो आहे आणि सुसंवाद साधण्यांमध्ये मला कुठेही अडचण आलेली नाही, असेही ते बोलून दाखवतात. लहानपणापासूनच बोलण्याची सवय, त्याचबरोबर आपलंसं करून घेण्याची सवय, वृद्धांशी बोलताना, समवयासकांशी बोलताना असो तरुणांशी बोलताना असो दत्ता आपला आहे, हा भावच सर्वांच्या मनात निर्माण व्हायचा. हीच वृत्ती पुढेही कायम राहिली. विविध पदे भूषविलेली आहेत. इतिहास मंडळाच्या विविध समित्यांमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये गुणवत्ता निर्माण करण्याचं काम त्यांनी पूर्ण आपल्या कार्यकाळात केलेलं आहे. त्यांचे अनेक गुण आहेत. वेळेपूर्वी जाणे, विद्यार्थ्यात मिसळणे, विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद साधणे, अडीअडचणी समजावून घेणे, घरगुती अडचणही विद्यार्थ्यांची सोडवण्यामध्ये हातखंडा असलेल्या प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी खरी प्राध्यापिकी मुलांमध्ये रुजवली. निर्मळ मनाचा प्राध्यापक म्हणूनही त्यांची ओळख आहे. इतकच नाही तर शिक्षकी पेश्या मध्ये शासनाच्या विविध उपक्रमामध्ये सहभागी होण्याचा मानही त्यांना मिळाला. एवढेच नाही तर अत्यावश्यक सेवा म्हणून राबवण्यात येणाऱ्या राज्य मंडळाच्या विविध कामांमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शासनाच्या निवडणूक विभागामध्ये काम करण्याचा त्यांचा अनुभव दांडगा आहे आणि आजही त्यांना निवडणूक विभागामध्ये काम करण्याची संधी मिळते. आजही अनेक शैक्षणिक संस्था अनेक सामाजिक संस्था अनेक सामाजिक भान असलेल्या व्यक्ती त्यांचा सल्ला घेण्यात कुठली कमतरता समजत नाही. सेवानिवृत्तीच्या पर्यंत आपल्या सेवेमध्ये सेवाभाव कसा राबवावा हे ज्यांनी इतरांना दाखवून दिले. परीक्षक, नियामक, पेपर सेटर तसेच मुख्य नियमांच्या सर्व भूमिका त्यांनी निभावल्या. बोर्डाच्या विविध समित्यांमध्ये सुद्धा त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. अशा सेवाभावी वृत्तीचा सुसंवादी प्राध्यापक सेवानिवृत्त होत आहे. विविध संतांनी सांगितलेले आहे की आपल्या कार्यात आपण सतत कार्यमग्न राहिलं पाहिजे. त्या कार्यात येणाऱ्या अडचणीवर मात केली पाहिजे. ही मात करताना कोणाशीही दुजाभाव राहणार नाही ही वृत्ती आपण बाळगली पाहिजे, हा संतांच्या अंगी असलेला भावाचा भावार्थ त्यांनी आपल्या जीवनामध्ये राबवलेला आहे.म्हणूनच पुढील काळात त्यांचा कविता संग्रह सुद्धा येत आहे. तसेच बाजी पासलकर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मावळा यावर त्यांचे पुस्तक सुद्धा प्रकाशित होत आहे. या दोन्ही पुस्तकांचे आयएसबीएन नंबर त्यांना मिळालेले असून त्यांचे लिखाण पूर्ण झालेला आहे आणि त्यांचे हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे सेवानिवृत्त होताना एकसुसंवादी प्राध्यापक यांचा सेवानिवृत्ती होत असताना दिसत आहे. ते सेवानिवृत्त होत असताना आपण पुढील कार्यात, पुढील जीवनात हेही सांगायला विसरले नाही की मी पुढील कार्यात सुद्धा असाच राहील व यात प्रगती करून समाजासाठी माझे कार्य थांबू देणार नाही. ज्या सरांनी योगाचंशिक्षण, समुपदेशनाचे शिक्षण, ज्यांच्याकडे सहकार क्षेत्रातील अकाउंटन्सी आणि ऑडिटिंग याचं शिक्षण आहे, ज्यांच्याकडे सहकार क्षेत्र धर्मादाय क्षेत्र यामध्ये सखोल ज्ञान आहे ,निवृत्तीनंतर वेळ मिळतो परंतु मी वेळेचं बंधन न पाळता समाजासाठी विद्यार्थ्यांसाठी माझ्या सहकारी शिक्षकांसाठी प्राध्यापकांसाठी वेळ देण्याचं काम मी नेहमी करणार आहे. अशा या सुसंवादी सेवानिवृत्ती प्राध्यापकाला सलाम. त्यांनी बोलताना व त्यांच्याशी सुसंवाद साधताना अनेक गोष्टींवर सखोल ज्ञान त्यांच्याजवळ आहे. आणि ते बोलताना म्हणाले की माझ्याशी संवाद करताना समोरच्याची समस्या निराकरण कसे होईल हे मी माझ्या जीवनात आतापर्यंत केलेला कार्य आहे तेही मी पुढे चालू ठेवणार असून विद्यार्थ्यांसाठी सतत मी त्यांचा गुरुजी म्हणून राहण्यात धन्यता मानणार आहे.

**चित्रकार, कवी संतोष बाबुराव आवटी**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५; निवडणूकीच्या पूर्व तयारीचा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला आढावा

# निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी ३ जानेवारीला प्रसिद्ध होणार

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व पथकांच्या कामकाजाचा आढावा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या.

मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आणि मूलभूत सुविधा शहरातील एकूण २९१ मतदान केंद्रांवर 'ॲश्युअर्ड मिनिमम फॅसिलिटी' (चक्र) अंतर्गत पाणी, वीज, रॅम्प आणि स्वच्छतागृहे यांसारख्या सोयीसुविधा तातडीने पूर्ण करण्याबाबत आढावा घेण्यात आला. तसेच, सर्व मतदान केंद्रांवर सुरक्षा आणि पारदर्शकतेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रक्रियेची गती वाढविण्याचे निर्देश श्रीमती मित्तल यांनी दिले.

**स्ट्राँग रूमची पाहणी आणि प्रशिक्षणाचे वेळापत्रक**

निवडणूक साहित्याच्या सुरक्षिततेसाठी तयार करण्यात आलेल्या 'स्ट्राँग रूम'ची पाहणी जिल्हाधिकारी स्वतः २ जानेवारी २०२६ रोजी करणार आहेत. निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांचे दुसरे महत्त्वाचे प्रशिक्षण ३ जानेवारी २०२६ रोजी सेंट मेरी हायस्कूल येथे पार पडेल. याव्यतिरिक्त, मतमोजणीबाबतचे पहिले प्रशिक्षण ७ जानेवारीला तर दुसरे प्रशिक्षण १२ जानेवारीला आयोजित करण्यात आले आहे.

**EVM कमिशनिंग आणि प्रशिक्षण**

मतदान यंत्रांबाबत (एतच्) ७ जानेवारी २०२६ रोजी विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रभाग क्र. १ ते १६ पर्यंतच्या सर्व मतदान यंत्रांचे 'कमिशनिंग' ८ जानेवारी रोजी दोन स्वतंत्र सत्रांत पूर्ण केले जाणार आहे.




**'स्वीप' अंतर्गत जनजागृतीचा जागर**

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'स्वीप' (ड्तएएझ) उपक्रमांतर्गत व्यापक मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये:

सार्वजनिक ठिकाणी बॅनर, पोस्टर्स आणि होर्डिंग्ज लावणे.

घंटागाडी आणि रिक्षांद्वारे प्रभागनिहाय ध्वनिक्षेपकावरून जनजागृती.

शालेय विद्यार्थ्यांमार्फत पालकांना पत्रलेखन आणि स्वाक्षरी मोहीम (Signature Campaign).

रांगोळी स्पर्धा, सोशल मीडिया प्रचार आणि 'मॅस्कॉट'ची (शुभंकर) नियुक्ती.

**महत्त्वाची तारीखः ३ जानेवारी २०२६**

दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक लढविणाऱ्या वैध उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने अधिकृत पत्रकार परिषद आयोजित करून निवडणूक प्रक्रियेची पुढील माहिती दिली जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी आणि निवडणूक विभागातील प्रमुख कर्मचारी उपस्थित होते.

## ठाकरे किड्स स्कुल च्या वार्षिक स्नेहसंमेलनात नृत्याच्या तालावर थिरकली लहान मुले





**जालना । प्रतिनिधी -** आझाद मैदान परिसरातील ठाकरे किड्स स्कुल च्या वार्षिक स्नेहसंमेलनात फादर म्हणजेच बाबा या थिम वर नाटक व मध्ये नृत्य सादर करण्यात आले.

१० व्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे नाट्यकार व नाट्यदिग्दर्शक सतीश लिंगडे व रंगभूषाकार वर्षाराणी लिंगडे हे होते या प्रसंगी मार्गदर्शन करताना आजच्या काळात मुलांना जीवन जगताना सहज गोष्टी न देता संघर्ष शिकवला पाहिजे सावली असलेल्या झाडाखाली दुसरे झाड कधी उगत नाही त्याला ऊन लागत असे उदाहरणा दाखल सांगितले. डॉक्टर इंजिनीअर शिवाय इतर क्षेत्रात सुद्धा करियर च्या संधी आहेत अभिनय क्षेत्रात सुद्धा बरेच मानधन कलाकारांना मिळते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप ठाकरे यांनी आपल्या पाल्याला मोबाईल सारख्या राक्षसा पासून दूर ठेवावे लागेल शिक्षकांवर शिस्तीसाठी शिक्षेस बंदी आल्यामुळे पालकांची मुलांच्या प्रति जबाबदारी वाढली आहे असे आवाहण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी नामदे व रसिक दीक्षित यांनी केले तर आभार प्रदर्शन मोनिका शहाणे व प्रतीक्षा कनकुटे यांनी केले.

वार्षिक स्नेहसंमेलनातं फादर म्हणजे बाबा या थीमवर राजा दशरथ व राम, कृष्ण जन्म, गीता फोगट ची कहाणी अश्या वेगवेगळ्या विषयावर नाटिका सादर केल्या गेल्या तर वेलकम, ग ग गणपती, लकडी कि काठी, चंदा ने पुछा तारो से, इती से हंसी, रोते रोते हसना सिखो, तू मेरा दिल तू मेरी जा, पापा मेरी जान, ये तो सच हैं के भगवान हैं, जरा सर तो झुकाओ वसुदेवजी, बेटा तू मेरी जान हैं, दमलेल्या बाबाची कहाणी, झिंगल बेल झिंगल बेल अश्या गाण्यावर शाळेतील मुले थिरकली. या स्नेहसंमेलनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना ठाकर तर राजश्री माचेवार, स्मिता टाकाळकर, गौरी देशमुख, माधुरी नामदे, मोनिका शहाणे, राऊत, संजीवनी सोनवणे, पूजा आंबेकर, प्रतीक्षा कनकुटे, रसिका दीक्षित, आदिती लोळगे, श्रावणी पिसाळ या शिक्षकांनी तर राधा कोकुलवार, विशाल जोगदंड, सागर चव्हाण, अश्विन बेराडो, समीर शेख या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. या प्रसंगी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उपशिक्षणाधिकारी वाळके, आदर्श शिक्षक देशपांडे यांचा शिक्षक पतसंस्थेतर्फे गौरव



**जालना । प्रतिनिधी -** शिक्षक पतसंस्थेच्यावतीने उपशिक्षणाधिकारीपदी निवडीबद्दल गजानन वाळके तर आदर्श शिक्षक प्रदीप नरहरराव देशपांडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात उभयतांच्या शिक्षण क्षेत्रातील दीर्घकालीन, निष्ठावान आणि गुणवत्तापूर्ण योगदानाचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, प्रशासकीय जबाबदाऱ्यांची प्रामाणिक अंमलबजावणी आणि शिक्षक समुदायासाठी दिलेले मार्गदर्शन यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

संस्थेचे चेअरमन जगत घुगे म्हणाले की, शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. गजानन वाळके यांनी प्रशासनात शिस्त, पारदर्शकता आणि संवेदनशीलता जोपासली, प्रदीप देशपांडे यांनी वर्गखोलीतून मूल्याधिष्ठित शिक्षणाची मशाल पेटवली. अशा व्यक्तिमत्वांचा सन्मान म्हणजे शिक्षक समाजाच्या कर्तृत्वाचा सन्मान असून, शिक्षक पतसंस्थेच्या माध्यमातून शिक्षकांच्या आर्थिक सक्षमीकरणासह शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सत्कारमूर्तींनी आपल्या भावना व्यक्त करत शिक्षण क्षेत्राशी आयुष्यभर निष्ठेने जोडलेले राहण्याचा संकल्प व्यक्त केला. या गौरव सोहळ्याला व्हाईस चेअरमन श्रीमती साधना गिऱ्हे, सचिव संतोष देशपांडे, खजिनदार अरुण जाधव, संचालक विकास पोथरे, रमेश हुशे, जगन्नाथ शिंदे, सुभाष भडांगे, गणेश भुतेकर, दिनेश एखंडे, रघुनाथ वाघमारे, सचिन गंगावणे, मधुकर काकडे, देवेंद्र बारगजे, संचालिका श्रीमती वैशाली देशमुख, तज्ञ संचालक बबनराव बोरुडे , वरिष्ठ मुख्याध्यापक एल. एम. जोशी, संस्थेचे व्यवस्थापक डी. एस. मराठे, एस. व्ही. धोत्रे, ए. एस. कायंदे यांची उपस्थिती होती.

## कृषी विभागाने ग्रीस्टॅक नोंदणी करावी - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी ग्रीस्टॅक योजना अंमलात आली आहे. वेळोवेळी शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करुन घेण्याचे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांचे कल्याण करणे हा कृषी विभागाचा मुळ विषय आहे. तरी ज्या शेतकऱ्यांची अद्यापही ग्रीस्टॅक नोंदणी प्रलंबित आहे, अशा शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने गावनिहाय शिबिराचे आयोजन करुन १० दिवसाच्या आत नोंदणी पुर्ण करावी, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कृषी उपसंचालक एस.एच.कायंदे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, शेतीच्या आधुनिकीकरणासाठी व शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ पारदर्शक पध्दतीने मिळावा यासाठी ग्रीस्टॅक योजना लागू केली आहे. शेतकऱ्यांची नोंदणी होवून फार्मर आयडी मिळाला तरच पीएमकिसान योजनेसह अन्य शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना घेता येणार आहे. तरी जिल्ह्यातील शेतकरी हितासाठी व कल्याणासाठी शासनाचा कृषी विभाग कार्यरत आहे. शेतकरी हिताची कामे कृषी विभागाने कोणत्याही परिस्थितीत प्राधान्याने करणे गरजेचे आहे. ग्रीस्टॅक योजनेचे काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे काम नाही, वेतन नाही ही पध्दत अवलंबिण्यात यावी.

## शास्त्री विद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी -** येथील स्थानिक लालबहादूर शास्त्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचे पहिले कृषीमंत्री आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य राजेश नवल सर यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी 'भाऊसाहेब अमर रहे' अशा घोषणांनी विद्यालय परिसर दुमदुमून गेला होता.